Ref. No.: QHTL/Sec/SE/2025-26/36

August 29, 2025

To,
The Manager,
Corporate Services,
BSE Limited,
14th floor, P J Towers, Dalal Street,
Mumbai – 400 001
Ref: Security ID: QUICKHEAL
Security Code: 539678

To,
The Manager,
Corporate Services,
National Stock Exchange of India Limited,
Exchange Plaza, Bandra Kurla Complex,
Bandra (E), Mumbai – 400 051
Symbol: QUICKHEAL
Series: EQ

Dear Sir/Madam,

**Subject: Newspaper Advertisement - Disclosure under Regulation 30 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.**

Pursuant to Regulation 30 and Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Section 108 of the Companies Act, 2013, read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, and in accordance with General Circular No. 09/2024 dated September 19, 2024, issued by the Ministry of Corporate Affairs, along with other applicable circulars issued in this regard, please find enclosed copies of the newspaper advertisements published in *Financial Express* (English) and *Prabhat* (Marathi), intimating that the 30th Annual General Meeting of the Company will be held on Thursday, September 25, 2025 at 11.00 A.M (IST) through Video Conferencing (VC) /Other Audio Visual Means (OAVM).

This is for your information and records.

Sincerely,
**For Quick Heal Technologies Limited**

Vikram Bharat Dhanani
Digitally signed by Vikram Bharat Dhanani
Date: 2025.08.29 17:48:45 +05'30'

**Vikram Dhanani**
**Compliance Officer**
Encl: As Above

# टॅरिफमुळे जयपूर दागिन्यांच्या बाजारपेठेत चिंता

## राजस्थानातून रत्ने आणि दागिन्यांची १८ हजार कोटींची होते निर्यात

**जयपूर, दि. २८-** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ५० टक्के कर लादल्यानंतर जयपूरच्या दागिन्यांच्या बाजारपेठेत चिंतेची लाट पसरली आहे. पर्यटनाबरोबरच रत्ने आणि दागिने जयपूरच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहेत. दागिने हे शहरासाठी परकीय चलन कमाईचा सर्वात मोठा स्रोत आहे; परंतु अमेरिकेने शुल्क वाढवल्याने, या भरभराटीच्या उद्योगाची चमक कमी होण्याची चिंता आहे. प्रसिद्ध जोहरी बाजार किंवा दागिने कारागिरांच्या बाजारापासून संपूर्ण परिसर पुढे काय होईल याबद्दल चिंतेत बुडालेला आहे.

एका वेबसाइटने दिलेल्या बातमीनुसार जेम पॅलेसचे मालक सुधीर कासलीवाल यांचे कुटुंब पिढ्यान्पिढ्या जयपूरच्या राजघराण्याचे वैयक्तिक ज्वेलर्स राहिले आहे. जयपूरच्या प्रसिद्ध राजमाता गायत्री देवी या त्यांच्या शाही संरक्षक होत्या आणि गेल्या काही वर्षांत जेम पॅलेसने त्यांच्या कालातीत कारागिरी आणि वारसा दागिन्यांसाठी प्रतिष्ठा मिळवली आहे. ओप्रा विन्फ्रेपासून ते अमेरिकेच्या माजी प्रथम महिला जॅकलिन केनेडी ओनासिसपर्यंत, आंतरराष्ट्रीय सेलिब्रिटींनी जेम पॅलेसमधील या स्टुडिओला भेट दिली आहे; परंतु अमेरिकेच्या शुल्कामुळे अशा पारंपरिक व्यवसायांवर परिणाम होऊ शकतो.

सुधीर कासलीवाल म्हणाले की अमेरिकेला आमचे निर्यात ऑर्डर पूर्णपणे थांबले आहेत. खरेदीदार आता ऑर्डर देण्यास तयार नाहीत. त्यांनी सांगितले की आमच्या स्टोअरला भेट देणाऱ्या परदेशी पर्यटकांपैकी ७० टक्के अमेरिकन आहेत आणि या शुल्कामुळे जयपूरमधील आमच्या विक्रीवरही निश्चितच परिणाम होईल. अमेरिकन पर्यटक खरेदी करणार नाहीत कारण त्यांना भारतात खरेदी केलेले दागिने घरी नेण्यासाठी भारी शुल्क भरावे लागेल.

### ख्रिसमसच्या ऑर्डर नाही

जयपूर ज्वेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष आणि एक आघाडीचे निर्यातदार आलोक सोंखिया म्हणाले की, आतापर्यंत आम्हाला ख्रिसमसच्या ऑर्डर मिळायला सुरुवात झाली असती, पण सध्या अद्याप एकही ऑर्डर आलेली नाही. काही निर्यातदारांनी सांगितले आहे की त्यांचे कन्साइनमेंट अमेरिकेत पोहोचले आहे, परंतु ग्राहक ते उचलत नाहीत. येत्या काही महिन्यांत याचा दागिन्यांच्या व्यवसायावर मोठा परिणाम होईल.

राजस्थानमधून रत्ने आणि दागिन्यांची एकूण निर्यात सुमारे १८,००० कोटी रुपये आहे. जयपूर व्यापाऱ्यांसाठी अमेरिका ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. जयपूर दरवर्षी सुमारे ३,२०० कोटी रुपयांचे तयार दागिने आणि रंगीत रत्ने अमेरिकेला निर्यात करते.

### जीवघेणा प्रवास...



पाटणा : गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे, पाटण्यातील जनजीवन विस्कळीत झाले असून स्थानिकांना सध्या बोटीतून प्रवास करावा लागत आहे.

# संरक्षण तंत्रज्ञान बळकटीसाठी दिल्लीत कार्यक्रम

**नवी दिल्ली, दि. २८-** क्वांटम मशीन लर्निंगमध्ये स्वदेशी नवोपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी, क्रिटिकल थिंकिंगला प्रोत्साहन देण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षण तंत्रज्ञान चौकटीला बळकटी देण्यासाठी पुढील महिन्यात दिल्लीमध्ये एक राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे.

बदलाच्या दशकात या मोहिमेअंतर्गत आयआयटी-मद्रास, इंडियन आर्मी रिसर्च सेल आणि सायबरपीस यांच्या सहकार्याने इंडियन आर्मी टेरियर सायबर क्वेस्ट २०२५ आयोजित केले जाते आहे. संरक्षण आणि सायबर सुरक्षा धोक्यांना तोंड देण्याच्या मुद्द्यावर यात विचार केला जाणार आहे.

सायबर क्वेस्ट आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय), मशीन लर्निंग (एमएल), क्वांटम कम्प्युटिंग आणि ड्रोन तंत्रज्ञान यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये नवोपक्रम आणि सहकार्याला प्रोत्साहन देईल. या स्पर्धेत एआय आणि एमएल वापरून भारतासाठी मजबूत प्रणाली तयार करण्यासाठी दोन प्रमुख आव्हाने समाविष्ट आहेत. सहभागींना राष्ट्रीय सुरक्षेत थेट योगदान देण्यासाठी हे व्यासपीठ उपलब्ध असणार आहे. संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे की त्यांची जाहिरात भारतीय सैन्याच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट आधुनिक संरक्षण आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रतिभावान लोकांना एकत्र आणणे हा आहे. क्वांटम मशीन लर्निंगमध्ये स्वदेशी नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे, गंभीर विचारसरणीला चालना देणे आणि राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षण तंत्रज्ञान चौकट मजबूत करू शकतील असे उपाय तयार करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

# राजकारणात असभ्य भाषेला स्थान नाही

**पाटणा, दि. २८-** बिहारमधील दरभंगा येथील व्यासपीठावरून



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी आक्षेपार्ह शब्दांचा वापर करण्यात आला आहे. यावर केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी प्रकारावर टीका केली आहे. ते म्हणाले की राजकारणात मतभेद असू शकतात, परंतु अश्लीलता आणि असभ्य भाषेला स्थान नाही.

राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांच्या भेटीच्या व्यासपीठावरून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी ज्या प्रकारची घाणेरडी आणि आक्षेपार्ह भाषा वापरली गेली ती केवळ निंदनीयच नाही तर लज्जास्पद देखील आहे. बिहारचे लोक या अपमानास्पद शब्दांना कधीही माफ करणार नाहीत, असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे.

मी नेहमीच म्हटले आहे की राजकारणात भाषेचा दर्जा पाळला पाहिजे. तुम्ही सभ्य शब्दांत कठोर हल्ला करू शकता, परंतु अशा प्रकारे शिवीगाळ करणे, तेही पंतप्रधानांवर, कोणालाही मान्य नाही, असे ते म्हणाले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली जमीन मिळकतचे **विद्यमान जमीन मालक तुकाराम भिकाजी गोळे** यांनी सदर जमीन मिळकतीवर त्यांचेशिवाय इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा, कुळ नाही असे प्रतिपादन करून त्यांनी सदरची जमीन मिळकत आमचे अशील यांना कायमस्वरूपी खुशखरेदीने तबदील करण्याचे मान्य व कबूल केले आहे. तसेच सदरील मिळकत निर्वेध व निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. सबब सदरील मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क, ताबा व अधिकार व अन्य इतर कोणत्याही प्रकारे करार मदार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **२० दिवसांचे** आत त्याबाबतच्या मूळ अस्सल कागदपत्रांनिशी खाली दिलेल्या पत्त्यावर समक्ष येऊन आमचे अशिलांतर्फे आमची खात्री पटवून द्यावी व लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा सदरील मिळकतीवर कोणाचाही हक्क हितसंबंध अधिकार नाही असे समजून व गृहित धरून आमचे अशील सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर कोणाचीही कोणत्याही व कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट :** तुकडी पुणे, पोट तुकडी वेल्हे, तालुका पंचायत समिती वेल्हे यांचे हद्दीतील जिल्हा परिषद पुणे यांचे हद्दीतील, मे. दुय्यम निबंधकसो वेल्हे यांचे हद्दीतील गाव मौजे रूळे येथील गट नं. ९५७ यासी ०० हे. ८९ आर अधिक पो.ख. ०० हे. १२ आर असे एकूण क्षेत्र ०१ हे. ०१ यासी एकूण आकार ०० रु. ६६ पैसे पैकी विद्यमान जमीन मालक **तुकाराम भिकाजी गोळे** यांच्या मालकी हक्काचे क्षेत्र ०० हे. ४४.५० आर अधिक ०० हे. ०६ आर असे एकूण क्षेत्र ०० हे. ५०.५० आर यासी आकार ०० रु. ३३ पैसे ही संपूर्ण जमीन मिळकत यासी चतुःसीमा येणेप्रमाणे - पूर्वेस :- गट नं. ३९२, दक्षिणेस :- याच गटातील रानवडे यांची मिळकत, पश्चिमेस :- गट नं. ९५४ व ९५३, उत्तरेस : गट नं. ९५९ व २५८ व व्यंकीज पोल्ट्री. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पुणे, दिनांक : २८/०८/२०२५.

**नागेश रामचंद्र शिंदे, ॲडव्होकेट**
ऑफिस : पीडीसीसी बँकेसमोर, तहसीलदार ऑफिसजवळ, वेल्हे, जि. पुणे- ४१२२१२.
मो. नं. ९०२१२१३१९३ / ९५११२०१३६३.
(पा. क्र. २५०८१६३२५७)

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली गाव मौजे नांदे, तालुका मुळशी, जिल्हा पुणे आणि दुय्यम निबंधक साहेब यांच्या कार्यक्षेत्रातील तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या हद्दीतील मिळकत (सदर मिळकत) ही **श्री. बाळू राघू बालवडकर, रा. पुणे** या विद्यमान मालकांच्या मालकीची आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असून विद्यमान मालकांना तिचे पणनयोग्य हक्क व अधिकार आहेत अशी खात्री व भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. आमचे अशिलांनी सदर मिळकत कायमखूश खरेदी घेण्याच्या दृष्टीने बोलणी चालू केलेली असून, सदर विद्यमान मालकांबरोबर तसा व्यवहार ठरविलेला आहे. आमचे अशिलांनी सदर विद्यमान मालकांचे सदर मिळकतीबाबतचे मालकीहक्क व अधिकार तपासणेस आम्हांस सांगितले आहे.

तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध जसे कुळ, खरेदीविक्री, गहाण, दान, बक्षीस, लीन, लीज अथवा तत्सम प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संबंधित कागदपत्रांनिशी समक्ष खात्री करून द्यावी. सदरच्या मुदतीत कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत न घेतल्यास सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे व कोणाचाही काही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोटतुकडी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे व मा. दुय्यम निबंधक साहेब, जिल्हा पुणे यांच्या कार्यक्षेत्रातील तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे हद्दीतील गाव **मौजे नांदे,** तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथील

१) **गट नंबर २०/३९** यांसी एकूण **क्षेत्र ०० हेक्टर २० आर** यांसी आकार रुपये ०.२५ पैसे, यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे-
पूर्वेस : श्री. शंकर श्रीपती रानवडे यांची मिळकत;
दक्षिणेस : नांदे म्हाळुंगे रस्ता;
पश्चिमेस : स.नं. २०/३८ श्री. बाळू राघू बालवडकर यांची मिळकत;
उत्तरेस : श्री. विश्वनाथ पंढरीनाथ रानवडे यांची मिळकत.

२) **गट नंबर २१/८** यांसी एकूण **क्षेत्र ०० हेक्टर १९.२० आर** यांसी आकार रुपये ०१.९४ पैसे यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे-
पूर्वेस : श्री. शंकर श्रीपती रानवडे यांची मिळकत;
दक्षिणेस : नांदे-म्हाळुंगे रस्ता;
पश्चिमेस : श्री. सुरेश गेनबा रानवडे यांची मिळकत;
उत्तरेस : श्री. विश्वनाथ पंढरीनाथ रानवडे यांची मिळकत.

असे विद्यमान मालकांचे खरेदी मालकीचे एकूण क्षेत्र **०० हेक्टर ३९.२० आर**

अशा वर्णनाची मिळकत तसेच त्यातील झाड-झाडोरा, दगड, माती, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, वगैरे सर्व तदंगभूत वस्तूसहित व जाणेयेणेचे वहिवाटीचे रस्त्याचे सर्व हक्कांसहित अशी मिळकत प्रस्तुत जाहीर नोटिसीचा विषय आहे.

येणेप्रमाणे सदर जाहीर नोटीस असे. पुणे, दिनांक : २९ ऑगस्ट २०२५

**प्रताप आणि जोशी असोसिएटस, ॲडव्होकेट्स,**
३०९ आणि ३१०, कॉमर्स सेंटर, शिवार गार्डन रेस्टॉरंटजवळ, शिवार चौक, रहाटणी, पुणे- ४११०१७, मोबा. ९८५०९६६५९३, ९८५०८१०६७६.
E-mail : adv.shilpapratap@gmail.com, adv.varshajoshi@gmail.com
(पा.क्र. २५०८०६६८५८)

## जाहीर नोटीस

**(गाव मौजे पेरणे येथील गट नं. १०६२ पैकी क्षेत्र ०० हे.७२ आर)**

तमाम लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **१. श्री. अशोक बाबुराव येवले, २. श्री. संभाजी बाबुराव येवले,** दोघे रा. घर नं. २८५, शिंदे वस्ती, सर्व्हे नं.४०/२, जामले प्लॉट, मांजरी रोड, जयमहाराष्ट्र कॉलनी, केशवनगर, मुंढवा, पुणे ४११०३६, **३. श्री. रामदास बबन येवले, ४. श्री. भगवान बबन येवले, ५. श्री. मनोहर ज्ञानोबा येवले, ६. सौ. शांताबाई ज्ञानोबा येवले व ७. सौ. शुभांगी रामदास येवले,** सर्व रा. पी. सी. पोल फॅक्टरी, पेरणे रोड, ता. हवेली, जि. पुणे ४१२२१६ यांची मालकी हक्काची व वहिवाटीची असुन सदरचे मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना नोंदणीकृत साठेखत लिहुन व नोंदवून दिलेले आहे. सबब विद्यमान मालकांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहीत असल्याची खात्री आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचा कसलाही गहाण, दान, बक्षीस, लिज, लिन, खरेदी, साठेकरार, करारनामा, चोळी-बांगडी, इतर व तत्सम हक्क अगर हितसंबंध असल्यास त्यांना सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसांत संबंधित कागदपत्रासह खात्री पटवून आमचेकडे लेखी हरकत कळवून पोहच घ्यावी. अन्यथा सदरचे मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे आणि ज्या कोणाचा काही हक्क, अधिकार असल्यास त्यांनी तो जाणिवपूर्वक सोडून दिला आहे, असे गृहीत धरून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी पुणे पोट तुकडी व तालुका हवेली मे. दुय्यम निबंधकसाहेब. हवेली नं. १ ते २७ यांचे हद्दीतील, पुणे जिल्हा परिषदेच्या तालुका हवेली पंचायत समितीचे कार्यक्षेत्रातील **गाव व ग्रामपंचायत मौजे पेरणे,** ता. हवेली, जि. पुणे येथील **गट नं. १०६२** यांसी क्षेत्र ०१ हे. ३० आर अधिक पोटखराबा ०० हे. २२ आर असे एकूण क्षेत्र ०१ हे. ५२ आर यांसी आकार ०३ रु.३४ पैसे यापैकी **१. श्री. अशोक बाबुराव येवले, २. श्री. संभाजी बाबुराव येवले, ३. श्री. रामदास बबन येवले, ४. श्री. भगवान बबन येवले, ५. श्री. मनोहर ज्ञानोबा येवले, ६. सौ. शांताबाई ज्ञानोबा येवले** यांचे मालकीचे अविभक्त संपूर्ण क्षेत्र ०० हे. ५९ आर व **७. सौ. शुभांगी रामदास येवले** यांचे मालकीचे संपूर्ण क्षेत्र ०० हे. १३ आर यांसी आकार ०० रु. ३३ पैसे असे एकूण क्षेत्र ०० हे. ७२ आर ही मिळकत यांसी चतुःसीमा खालीलप्रमाणे :-

पूर्व : गट नं. १०६१ व गट नं. १०६२ पैकी उर्वरित मिळकत, दक्षिण : गट नं. १०६३ ची मिळकत, पश्चिम : गट नं. १०५१ व १०५० ची मिळकत, उत्तर : पेरणे- डोंगरगाव रोड.

दिनांक २८/०८/२०२५

**प्राजक्ता विजय आव्हाळे, ॲडव्होकेट**
ऑफीस नं. १०१, पहिला मजला, ९-कृष्णकुंज बिल्डिंग, लाईफलाईन हॉस्पिटलशेजारी, पुणे-नगर रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे ४१२२०७
मो. नं. ७३८५५९२०५५ (पा.क्र.२५०१६३२८५)

## जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आम्ही मेटॅलिस्ट फोर्जिंग्ज लिमिटेड (यापूर्वी अहमदनगर फोर्जिंग्ज लिमिटेड), एक पब्लिक कंपनी (CIN: L28910MH1977PLC019569), जिचा नोंदणीकृत पत्ता : गट क्रमांक ६१४, गाव कुरुळी, खेड, पुणे, महाराष्ट्र, भारत – ४१०५०१ असा आहे (**"मालक"**) यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या (**"मालमत्ता"**) मालमत्तेतील त्यांचे अधिकार, हक्क, हितसंबंध आणि शेअर यांच्या संबंधातील हक्क विलेखांची चौकशी करीत आहोत. आमचे अशिल मालकांशी मालमत्तेच्या तुकड्याची खरेदी करण्यासाठी वाटाघाटी करीत आहेत.

सदर मालमत्तेतील मालकांच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील वारसा, गहाण, विक्री, विक्री करारनामा, विकास अधिकाराचे प्रदान, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, लायसन्स, शेअर, धारणाधिकार, आकार, न्यास, वारसा, परिरक्षा, सुविधाधिकार, मार्गाधिकार, बक्षिस, संपादन, अधिग्रहण, कोणतेही भार किंवा लाभाधिकार कोणत्याही न्यासा खालील हितसंबंध, मार्गाधिकार किंवा अग्रक्रयाधिकार किंवा कोणताही करारनामा, किंवा अन्य विल्हेवारी, कोणताही विवाद, कोणत्याही न्यायालयाने किंवा प्राधिकरणाने संमत केलेला हुकूमनामा, व्यादेश, आदेश किंवा जप्ती किंवा निवाडा, विवाद, प्रलंबित वाद, कोणत्याही न्याय निर्णित प्राधिकरणाचा हुकूमनामा किंवा आदेश, अदलाबदल, विभाजन, मुखत्यार नामा, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, एफ एस आय, भाडेदारी, विकास अधिकार, कुटुंबव्यवस्था / तडजोड, कब्जा, वाटप किंवा अन्यथा (**"दावे"**) याद्वारे कोणताही दावा आणि/ किंवा मागणी असेल अशा सर्व व्यक्तींनी निम्नस्वाक्षरीकर्ता यांना **खैतान अँड कंपनी,** ॲडव्होकेट्स, ७ वा मजला, पंचशील अव्हेन्यू, प्लॉट क्रमांक ७१, कल्याणी नगर-वडगाव शेरी रोड, येरवडा, पुणे-४११००६ येथील पत्त्यावर आणि alpesh.parekh@khaitanco.com, या ईमेल वर या जाहिरातीच्या तारखेपासून **१४ ( चौदा )** दिवसांच्या आत पाठींबा देणाऱ्या दस्तावेजी पुराव्याच्या प्रतींसह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळवावे अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा प्रकारचे कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत असे गृहीत धरण्यात येईल आणि जर असे दावे असतील तर त्यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे असे समजण्यात येईल आणि ते मालकांवर आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही .

**परिशिष्ट**

गाव कुरुळी, तालुका खेड, जिल्हा पुणे येथील खालील ३ (तीन) गट क्रमांकामध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग, एकूण क्षेत्रफळ ६१,७०० चौरस मीटर अंदाजे.

| अनु क्र. | गट क्र. | गट क्रमांकाचे एकूण क्षेत्रफळ (चौ. मी.) | मालका कडील क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|
| १. | ६१४ | ७६,२०० | ४८,८०० |
| २. | ६३० | २४,९०० | ११,१०० |
| ३. | ६३१ | २,६०० | १,८०० |
| एकूण | | १,०३,७०० | ६१,७०० |

आज दिनांक २९ ऑगस्ट, २०२५

खैतान अँड कंपनी करीता
सही/–
अल्पेश पारेख
भागिदार

## जाहीर नोटीस

खालील परिशिष्टात वर्णन केलेली रो-हाऊस मिळकत **श्री. राजा ओमप्रकाश गोधवानी आणि सौ. सोनल राजा गोधवानी** यांचे मालकीची व ताबेवहिवाटीची असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारासंबंधाने त्यांचेमध्ये व आमचे अशील यांचेमध्ये आपसात बोलणी चालू आहेत. सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

तरी या नोटिशीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, लिन, लिज अथवा कसलाही हक्क अथवा हितसंबंध असल्यास तसे त्यांनी खालील पत्त्यावर आमचे अशिलांची समक्ष भेट घेऊन कागदपत्रानिशी आमचे अशिलांची खात्री पटवून द्यावी, अन्यथा सदरचे मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क अथवा हितसंबंध नसून सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आमचे अशील सदरचे मिळकतीसंबंधाने पुढील व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट** : तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका हवेली, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील महसुली गाव पिंपळे सौदागर, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील मिळकत **स.नं. ९६, हिस्सा नं. २, सर्व्हे नं. ९७, हिस्सा नं. २, सर्व्हे नं. ९८, हिस्सा नं. १ व सर्व्हे नं. ९८, हिस्सा नं. २, साईपर्ल गृहरचना संस्था मर्यादित** मधील फेज नं. १ मधील **रो हाऊस नं. १** क्षेत्र १२१.३१ चौ.मी. (कारपेट) व २०.३६ चौ.मी. क्षेत्रफळाचा संलग्न टेरेस, १३.२३५ चौ.मी. बाल्कनी, १२८.६० चौ.मी. मोकळी जागा, व १०.२४ चौ.मी. पार्किंगसह रो-हाऊस मिळकत. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे. कळावे, दिनांक : २८/०८/२०२५.

**स्वाती लांडगे, ॲडव्होकेट**
१२६२ अे, प्रेस्टीज चेंबर्स, जंगली महाराज रोड, डेक्कन, पुणे- ४११००५.
मो. नं. ८५५४८८७५५५.
(पा.क्र.२५०८०६६८५५)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत नवीन शर्तीची (इनाम ६ब) मिळकत ही १) श्री. रमेश शांतीलाल गुगळे, २) श्री. विराज गौतम गेलडा यांचे खरेदी मालकी हक्काची व ताबे वहिवाटीची असून, सदर मिळकत त्यांनी श्री. विनायक पंढरीनाथ भोंगाळे रा. गंधर्वनगरी, मोशी, पुणे ४१२१०५ यांना कायमखुष देण्याचे ठरवून तसा साठेखताचा दस्त लिहून व नोंदवून दिलेला आहे. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व पणनयोग्य असल्याचा भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. सदर मिळकतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, दावा, ताबा, कुळहक्क, वहिवाट, लेखी/तोंडी करार, गहाण, दान, लीज, पोटगी, बोजा, साठेखत, विसार अगर मुखत्यारपत्र अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१५ (पंधरा) दिवसांचे आत** जिल्हाधिकारी/तहसील कार्यालयात मूळ कागदोपत्री पुरावा दाखवून खात्री पटवून द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे व त्यावर कोणाचाही हक्क नाही व तसा कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

तसेच, जमीन विक्रीकामी जमीनमालक १) श्री. रमेश शांतीलाल गुगळे, २) श्री. विराज गौतम गेलडा यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे विक्री परवानगी मागितली आहे. सदरची जमीन ते श्री. विनायक पंढरीनाथ भोंगाळे यांना एकूण उक्ती रक्कम रु. ३०,००,०००/- ला विक्री करणार आहेत. शासन परिपत्रक नं. डब्ल्युटीएन १०९९/सीआर/२२९/ल-४ दिनांक १० मार्च २००० मधील मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या सूचनेनुसार गावाच्या ५ किलोमीटर परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमूद किमतीस खरेदी घेणेस इच्छुक असल्यास लेखी स्वरूपात **१५ दिवसांचे आत** तहसील/जिल्हाधिकारी कार्यालय यांना लेखी कळवावे.

**परिशिष्ठ**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका शिरूर, मा. दुय्यम निबंधक साहेब शिरूर, तसेच पुणे जिल्हा परिषद, तालुका पंचायत समिती शिरूर व ग्रामपंचायत आपटी यांचे हद्दीतील गाव मौजे आपटी येथील मिळकत गट नं. ३३७, यांसी क्षेत्र ०० हे. ७४ आर यांसी आकार ०१ रु. ८७ पैसे मिळकत यांसी चतुःसीमा :- पूर्वेस : गट नं. ३३६ पैकी, दक्षिणेस : आपटी-वढू डांबरी रस्ता व न. म.पैकी उर्वरित क्षेत्र, पश्चिमेस : गट नं. ३३८, उत्तरेस : लागू रस्ता व गट नं. २८०.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे. पुणे, दिनांक : २८/०८/२०२५

**राधिका योगेश देवचके, ॲडव्होकेट**
७०२, भूमी प्राईड, आळंदी रोड, मोशी, पुणे - ४१२१०५, मो. ९८५०२७५०९४.
(पा. क्र. २५०८१६३२६०)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत नवीन शर्तीची (इनाम ६ब) मिळकत ही १) श्री. गोविंद रामचंद्र इंगळे, २) सौ. राजश्री मिलिंद गायकवाड यांचे वडिलोपार्जित मालकी हक्काची व ताबे वहिवाटीची असून, सदर मिळकत त्यांनी श्री. विनायक पंढरीनाथ भोंगाळे रा. गंधर्वनगरी, मोशी, पुणे ४१२१०५ यांना कायमखुष देण्याचे ठरवून तसा साठेखताचा दस्त लिहून व नोंदवून दिलेला आहे. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व पणनयोग्य असल्याचा भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. सदर मिळकतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, दावा, ताबा, कुळहक्क, वहिवाट, लेखी/तोंडी करार, गहाण, दान, लीज, पोटगी, बोजा, साठेखत, विसार अगर मुखत्यारपत्र अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१५ (पंधरा) दिवसांचे आत** जिल्हाधिकारी/तहसील कार्यालयात मूळ कागदोपत्री पुरावा दाखवून खात्री पटवून द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे व त्यावर कोणाचाही हक्क नाही व तसा कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

तसेच, जमीन विक्रीकामी जमीनमालक १) श्री. गोविंद रामचंद्र इंगळे, २) सौ. राजश्री मिलिंद गायकवाड यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे विक्री परवानगी मागितली आहे. सदरची जमीन ते श्री. विनायक पंढरीनाथ भोंगाळे यांना एकूण उक्ती रक्कम रु. ५१,००,०००/- ला विक्री करणार आहेत. शासन परिपत्रक नं. डब्ल्युटीएन १०९९/सीआर/२२९/ल-४ दिनांक १० मार्च २००० मधील मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या सूचनेनुसार गावाच्या ५ किलोमीटर परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमूद किमतीस खरेदी घेणेस इच्छुक असल्यास लेखी स्वरूपात **१५ दिवसांचे आत** तहसील/जिल्हाधिकारी कार्यालय यांना लेखी कळवावे.

**परिशिष्ठ**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका शिरूर, मा. दुय्यम निबंधक साहेब शिरूर, तसेच पुणे जिल्हा परिषद, तालुका पंचायत समिती शिरूर व ग्रामपंचायत आपटी यांचे हद्दीतील गाव मौजे आपटी येथील मिळकत गट नं. ३४१, यांसी क्षेत्र ०० हे. ५२ आर यांसी आकार ०१ रु. २५ पैसे मिळकत यांसी चतुःसीमा :- पूर्वेस : गट नं. ३३८, दक्षिणेस : रस्ता, पश्चिमेस : गट नं. ३४२, उत्तरेस रस्ता. येणेप्रमाणे जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे. पुणे, दि. २८/०८/२०२५

**राधिका योगेश देवचके, ॲडव्होकेट**
७०२, भूमी प्राईड, आळंदी रोड, मोशी, पुणे - ४१२१०५, मो. ९८५०२७५०९४.
(पा. क्र. २५०८१६३२५९)

## Quick Heal

**क्विक हील टेक्नॉलॉजिज लिमिटेड**
**सीआयएन:** L72200MH1995PLC091408
**नोंदणीकृत कार्यालय:** ७वा मजला, सॉलिटेअर बिझनेस हब (पूर्वीचे मार्वल एज) ऑफिस क्र. ७०१० सी आणि डी, विमान नगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१४
**दुरध्वनी:** +९१ (२०) ६६८१ ३२३२; **इमेल:** cs@quickheal.co.in; **संकेतस्थळ:** www.quickheal.co.in

**३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि इ-वोटिंगद्वारे आयोजित करण्याबाबतची सूचना**

कृपया लक्षात घ्या की क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेड (कंपनी) च्या सदस्यांची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केली जाइल. ही सभा कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए) द्वारे १९ सप्टेंबर २०२४ रोजी जारी केलेल्या सामान्य परिपत्रक क्रमांक ०९/२०२४ आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सेबी) द्वारे ३ ऑक्टोबर २०२४ रोजी जारी केलेल्या परिपत्रक SEBI/HO/CFD/CFD-PoD-२/P/CIR/२०२४/१३३ तसेच इतर लागू कायद्यांच्या अनुषंगाने आयोजित केली जाईल.

वरील परिपत्रकांच्या अनुपालनात, एजीएम ची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२४–२५ साठीचा वार्षिक अहवाल इमेल आयडी नोंदणीकृत असलेल्या सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवण्यात येईल. हे दस्तावेज कंपनीच्या संकेतस्थळावर www.quickheal.co.in मधील इनव्हेस्टर्स विभागात, www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या संकेतस्थळावर https://instavote.linkintime.co.in येथे उपलब्ध असतील.

ज्यांनी कंपनी / डिपॉझिटरी सहभागी (डीपी) यांच्याकडे आपला इमेल आयडी नोंदवलेला नाही, अशा भागधारकांना आर्थिक वर्ष २०२४–२५ साठीच्या वार्षिक अहवालाची वेब लिंक प्रदान करणारे पत्र पाठवण्यात येत आहे.

सभासद व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे https://instavote.linkintime.co.in च्या वेब लिंक द्वारे एजीएम मध्ये सहभागी होऊ शकतात आणि त्यांची उपस्थिती कायदा कलम १०३ अंतर्गत कोरम मोजण्यासाठी ग्राह्य धरली जाईल.

सर्व सभासदांना असे सूचित करण्यात येते की

१. इजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या प्रस्तावांवर मतदान दूरस्थ ई–मतदान किंवा इजीएममधील ई–मतदान प्रणालीद्वारे केले जाऊ शकते.
२. दूरस्थ ई–मतदान सोमवार, २२ सप्टेंबर २०२५ रोजी मध्यरात्री १२:०१ वाजता (भाप्रवे) सुरू होईल.
३. दूरस्थ ई–मतदान बुधवार, २४ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता (भाप्रवे) संपेल.
४. २४ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजल्यानंतर (भाप्रवे) दूरस्थ ई–मतदान करण्यास अनुमती दिली जाणार नाही.
५. दूरस्थ ई–मतदान किंवा इजीएममध्ये मतदानाच्या पात्रतेसाठी कट–ऑफ १९ सप्टेंबर २०२५ असेल.
६. ज्या सदस्यांनी त्यांचा इमेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही आणि/किंवा कोणतीही व्यक्ती, ज्यांनी कंपनीचे समभाग विकत घेतले आणि एजीएमची सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे सदस्य बनले आणि कट–ऑफ तारखेनुसार म्हणजे १९ सप्टेंबर २०२५ रोजी समभागधारक झाले, ते enotices@in.mpms.mufg.com वर विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात.

दूरस्थ ई–मतदान, एजीएममध्ये उपस्थित राहणे, केवायसी अपडेट करणे आणि बँक तपशीलाविषयी काही शंका/तक्रारी असल्यास, सभासद एमयूएफजी इनटाईम यांच्याशी enotices@in.mpms.mufg.com येथे संपर्क साधू शकतात.

ज्या सभासदांना एजीएममध्ये पाहण्यासाठी व व्हिसीद्वारे सहभागी होण्यासाठी कुठल्याही तांत्रिक मदतीची आवश्यकता असल्यास त्यांनी पुढील हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा ०२० २६१६००८४, ०२२ ४९१८ ६००० आणि ०२२ ४९१८६१७५.

क्विक हील टेक्नॉलॉजिज लिमिटेड करिता,
स्वाक्षरी/–
कैलाश काटकर (DIN: ००३९७१९१)
अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक

**स्थळ:** पुणे
**तारीख:** २९ ऑगस्ट २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसाद्वारे कळिवण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे इंपेरियल प्राईम रियल्टर्स एलएलपी, एक नोंदणीकृत लिमिटेड लायब्लिटी पार्टनरशिप (एलएलपी) जी लिमिटेड लायब्लिटी पार्टनरशिप ॲक्ट, २००८ अन्वये अंतर्भूत झालेली असून तिचे तर्फे नियुक्त भागीदार १. कुलमीत सिंग छाबरा आणि २. जमीत सिंग छाबरा हेच विद्यमान मालक आहेत.

खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीवरील विद्यमान मालकांची असलेली मालकी व पणनयोग्य हक्क व अधिकार तपासण्याचे व ते निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याचे प्रमाणपत्र देण्याबाबत मला सुचित केलेले आहे.

तरी कोणाचाही खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीवर काहीही हक्क, हितसंबंध जसे गहाण, दान, लीज, लीन, बक्षीस, पोटगी, अन्नवस्त्र, निवारा, वारसा, करारमदार, इत्यादी असल्यास अशा इसमांनी आपला हक्क, हितसंबंध प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाले दिवसापासून १४ दिवसांत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी कळवावेत. तसेच सुचित करून देखीलही सदरच्या मुदतीत कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत न घेतल्यास असे सर्व हक्क, हितसंबंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येईल आणि तदनंतर माझेकडून परिशिष्टातील मिळकतीबाबत योग्य ते पणनक्षम प्रमाणपत्र देण्याची कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील गांव मौजे आव्हाळवाडी येथील गट क्रमांक ८५३ (पुर्वीचे गांव मौजे वाघोली येथील गट क्रमांक २०६८) यांसी एकुण क्षेत्र ०१ हेक्टर ४४ आर (ज्यामध्ये पोटखराब्याचे क्षेत्र ०० हेक्टर ०२ आर समाविष्ट आहे) अशी हि मिळकत यांसी चतुःसीमा येणेप्रमाणे :–
उत्तरेस : गट क्रमांक ८५२ आणि ८५४, आव्हाळवाडी, पुणे हि जमीन मिळकत
दक्षिणेस : वाघोली – आव्हाळवाडी रस्ता
पूर्वेस : गट क्रमांक ८५२, आव्हाळवाडी, पुणे हि जमीन मिळकत
पश्चिमेस : वाघोली– आव्हाळवाडी रस्ता
येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे तारीख २८ ऑगस्ट, २०२५

**चंदन एम. पारवानी, ॲडव्होकेट**
जी–११, अशोका पॅव्हिलियन, तळ मजला, डॉ. आंबेडकर रोड, पुणे ४११ ००१.
फोन नंबर २६११४५६७/८, २६०५०९९०

## जाहीर नोटीस

(तुकडी पुणे, पोटतुकडी व तालुका मुळशी, मे. दुय्यम निबंधक मुळशी सह दुय्यम निबंधक मुळशी व तालुका पंचायत समिती मुळशी व जिल्हा परिषद मुळशी यांचे हद्दीतील गाव **मौजे ताथवडे येथील शेतजमीन सर्वे नंबर १६ व इतर १८ यापैकी श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव** यांचे हिश्याची परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या एकूण मिळकतीपैकी १४ हेक्टर ९०.८४ आर असे अविभक्त हिश्यामधील स्वतंत्र क्षेत्राबाबत)

तमाम लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही मयत विठू ऊर्फ विठोबा तुकाराम पवार यांच्या एकत्र कुटुंबाच्या मालकीची मिळकत आहे. मयत विठू ऊर्फ विठोबा तुकाराम पवार यांचे निधनानंतर सदर मिळकतीचे ७/१२ रेकॉर्डला फेरफार नं. ८०३ अन्वये वारस नोंद होऊन मिळकतीचे ७/१२ रेकॉर्डला एकुमें म्हणून म्हातू विठोबा पवार यांचे नाव दाखल झालेले होते. परिशिष्ट मिळकतीच्या अनुषंगाने म्हातू विठोबा पवार यांनी गैरफायदा घेऊन सदर मिळकतीच्या अनुषंगाने बेकायदेशीर कृत्य केलेले आहे. मयत विठोबा तुकाराम पवार यांना वारस म्हणून श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे, श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव व श्रीमती यमुनाबाई विठोबा साळुंके असे वारस आहेत. परिशिष्ट मिळकतीचे आजमितीपर्यंत सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. परिशिष्ट मिळकतीमध्ये श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांचा स्वतंत्र अविभक्त हिस्सा होता व आहे. परिशिष्ठ मिळकतीमध्ये श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांचा १४ हेक्टर ९०.८४ आर क्षेत्राचा अविभक्त निश्चित क्षेत्र/हिस्सा होता व आहे. नमूद अविभक्त हिस्सा मूळ मालक श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांनी श्री. युवराज रोहिदास शिंदे व सुरेश शिवराम शिंदे यांचे मान्यतेने श्री. अतुल दामाजीराव बगाडे यांना कायमखूश खरेदी देण्याचे मान्य व कबूल करून, ठरलेल्या एकूण मोबदला रकमेपैकी भाग रक्कम स्वीकारून दिनांक २८/८/२०२३ आणि ४/९/२०२३ रोजी अंतिम करारनामा, कुलमुखत्यार पत्राचे दस्त लिहून, नोंदवून दिलेले आहेत. श्री. अतुल बगाडे यांना मूळ नमूद मालकांनी त्यांचा अविभक्त हिस्सा कायमखूश खरेदी देण्यासाठी लिहून दिलेल्या अंतिम करारनाम्यातील सर्व हक्क व अधिकार आमचे अशिलांना असाईन/वर्ग करण्याकामी आवश्यक ते दस्त ठरलेला असाईनमेंट दस्तातील एकूण भरणा रकमेपैकी भाग रक्कम स्वीकारून दिनांक ८/८/२०२५ रोजी लिहून, नोंदवून दिलेला आहे. तसेच परिशिष्ट मिळकतीमधील श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांच्या १४ हेक्टर ९०.८४ आर क्षेत्राचा अविभक्त निश्चित क्षेत्र/हिस्सा श्री. युवराज रोहिदास शिंदे व सुरेश शिवराम शिंदे यांनी वाटप करून घेण्याची जबाबदारी स्वीकारलेली आहे. त्याअनुषंगाने श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांच्या १४ हेक्टर ९०.८४ आर क्षेत्राचा अविभक्त निश्चित क्षेत्र/हिस्सा श्री. युवराज रोहिदास शिंदे व सुरेश शिवराम शिंदे यांनी स्वतःच्या खर्चाने पुणे येथील दिवाणी न्यायालयामध्ये स्पे.मु.नंबर १५८/२०२२ असा दाखल केलेला आहे. नमूद दिवाणी दाव्याचा अंतिम निकाल झालेनंतर आमचे अशील तो हिस्सा कायमखूश खरेदी घेण्यास बांधील आहेत व ठरलेल्या एकूण भरणा रकमेपैकी अदा केलेली भाग रक्कम वजावट करून उर्वरित भरणा रक्कम श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांना नमूद एकूण मिळकतीपैकी १४ हेक्टर ९०.८४ आर क्षेत्राचे खरेदीखताचा दस्त लिहून, नोंदवून देऊन नमूद क्षेत्राचा प्रत्यक्ष व खुला ताबा आमचे अशिलांना देतेवेळी आमचे अशील उर्वरित रक्कम अदा करण्यास सदैव तयार आहेत.

तरी सदर मिळकत ही आमचे अशिलांना श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांच्या १४ हेक्टर ९०.८४ आर क्षेत्राचा अविभक्त निश्चित क्षेत्र/हिस्सा श्री. युवराज रोहिदास शिंदे व सुरेश शिवराम शिंदे यांचेकडून कायमखूश खरेदी घेण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त झालेला आहे. सदर मिळकतीमध्ये काही उपद्व्यापी इसमांनी बेकायदेशीरपणे तथाकथित दस्त अस्तित्वात आणलेले आहेत. सदर मिळकतीच्या अनुषंगाने श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांच्या १४ हेक्टर ९०.८४ आर क्षेत्राचा अविभक्त निश्चित क्षेत्र/हिस्सा श्री. युवराज रोहिदास शिंदे व सुरेश शिवराम शिंदे यांनी मे. दिवाणी न्यायालय, पुणे येथे योग्य ते दिवाणी दावे दाखल केलेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये सदर मिळकतीच्या अनुषंगाने बांधकाम क्षेत्राच्या बाजारामध्ये उपद्व्यापी इसम खोट्या व चुकीच्या माहितीचा वापर करून सदर मिळकतीमध्ये तथाकथित हक्क असलेबाबत बतावणी करीत असल्याची माहिती नुकतीच आमचे अशिलांना प्राप्त झालेली आहे. त्यामुळे सदर मिळकतीचे मूळ मालक म्हणजेच श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांच्या व्यतिरिक्त इतर कोणाबरोबरही सदर मिळकतीमध्ये बेकायदेशीर व कोणत्याही कायदेशीर हक्काशिवाय चालू असलेल्या कृत्याच्या अनुषंगाने काहीएक तथाकथित व्यवहार, व्यापार इत्यादी करू नयेत. नमूद मिळकतीच्या अनुषंगाने आजमितीपर्यंत अस्तित्वात असलेले कोणतेही तथाकथित व्यवहार आमचे अशिलांनी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या मान्य केलेले नाहीत अथवा त्याकामी कोणतीही संमती कोणालाही दिलेली नाही.

सदर मिळकतीबाबत जमीन विकसन क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या सराईत भू-माफियाकरवी कोणाचेही कोणत्याही स्वरूपाची फसवणूक होऊ नये म्हणून प्रस्तुतची जाहीर नोटीस ही तमाम लोकांना सदर मिळकतीमधील आमचे अशिलांचे कायदेशीर हक्क व श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांच्या मालकीहक्कांबाबत माहिती व्हावी, या प्रामाणिक उद्देशाने प्रस्तुतची जाहीर नोटीस तमाम लोकांचे हितार्थ प्रसिद्ध केलेली आहे. याउपर सदर मिळकतीबाबत कोणी काही तथाकथित व्यवहार, कृत्य, वागणूक इत्यादी केल्यास अथवा पूर्वी केली असल्यास असे तथाकथित व्यवहार हे श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव व आमचे अशिलांचे कायदेशीर हक्कावर बंधनकारक राहणारे नाहीत, याची नोंद संबंधितांनी घ्यावी व त्याकामी योग्य ते कायदेशीर पाऊल फसवणूक करणारांविरुद्ध कायद्याप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे.

तरी प्रस्तुतची जाहीर नोटीस ही कोणाचे काही आर्थिक अथवा अन्य स्वरूपाचे नुकसान होऊ नये व नुकसान झालेल्या इसमांनी नुकसानीच्या अनुषंगाने वेळेत कायदेशीर कारवाई करण्याकामी प्रसिद्ध केलेली आहे.

**।। परिशिष्ट ।।**

**मिळकतीचे वर्णन-** तुकडी पुणे, पोटतुकडी व तालुका मुळशी, मे. दुय्यम निबंधक मुळशी सह दुय्यम निबंधक मुळशी व तालुका पंचायत समिती मुळशी व जिल्हा परिषद मुळशी यांचे हद्दीतील मुलकी गाव मौजे ताथवडे येथील शेतजमीन मिळकती खालीलप्रमाणे-

ए) **स.नं. ६/२/अ,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. १६ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०१ रु. ०० पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर १२ आर.
बी) **स.नं. ६/२/ब,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. १६ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०१ रु. ०० पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर १२ आर.
सी) **स.नं. २९/२,** यांसी एकूण क्षेत्र ०१ हे. ७२ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ११ रु. १२ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर ५४ आर.
डी) **स.नं. ४१/१अ,** यांसी एकूण क्षेत्र ०१ हे. ३१ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०५ रु. ६६ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर ९८.२५ आर.
इ) **स.नं. ८०/१/१अ,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ९०.५ आर, (पोटखराब्यासह) आकार ०२ रु. ६४ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हे. ६७.८७ आर.
एफ) **स.नं. ८४/३अ,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. १८ आर, (पोटखराब्यारासह) यांसी आकार ०० रु. ५१ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर १३.५ आर.
जी) **स.नं. १२४/२,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ०१ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०० रु. ०५ पै.,
एच) **स.नं. १२५/१,** यांसी एकूण क्षेत्र ०३ हे. ६३ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार १४ रु. ४२ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०२ हेक्टर ७२.२५ आर.
आय) **स.नं. १२७/२,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ४० आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०२ रु. १९ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर ३० आर.
जे) **स.नं. १२८/३,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ३६ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०२ रु. ६४ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर २७ आर.
के) **स.नं. १२८/४,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. १७ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०० रु. ६२ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर १२.७ आर.
एल) **स.नं. १२९/२अ,** यांसी एकूण क्षेत्र ०१ हे. ९९ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०१ रु. ३४ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०१ हेक्टर ४९.२५ आर.
एम) **स.नं. १२९/३,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. १६ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०० रु. ३७ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर १२ आर.
एन) **स.नं. १३१,** यांसी एकूण क्षेत्र ०४ हे. १५ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार १६ रु. ३६ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०३ हेक्टर ११.२५ आर.
ओ) **स.नं. १३३** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ५५ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०० रु. ०१ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर ४१.२५ आर.
पी) **स.नं. १५६/१/१,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ६९ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०१ रु. २८ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर ५१.७५ आर.
क्यू) **स.नं. १६५/२,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ५० आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०३ रु. ३४ पै., यापैकी क्षेत्र ०० हेक्टर १२.५० आर पैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर ९.३७ आर.
आर) **स.नं. १७०/१,** यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ८७ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार ०५ रु. ६२ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०० हेक्टर ६५.२५ आर.
एस) **स.नं. १६** यांसी एकूण क्षेत्र ०३ हे. ०३ आर, (पोटखराब्यासह) यांसी आकार १८ रु. ६२ पै., यापैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०३ हेक्टर ३५ आर एकूण क्षेत्र ०० हेक्टर ५१.२५ आर.

येणेप्रमाणे परिशिष्ट मिळकत त्यातील चालू वापराचे, वहिवाटीचे, इजमेंटचे, जाणे येणेचे मालकीचे हक्क व अधिकारासह दरोबस्त मिळकतीमधील श्रीमती पारूबाई ऊर्फ पार्वती दामुजी ऊर्फ दामोदर चिंचवडे व श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा जाधव यांचा एकूण मिळकतीपैकी १४ हेक्टर ९०.८४ आर असे अविभक्त हिश्याचे संपूर्ण क्षेत्र.

येणेप्रमाणे परिशिष्टासह जाहीर नोटीस असे. पुणे, दिनांक : २८/०८/२०२५

**राजेश लक्ष्मणराव ऊर्फ आप्पासाहेब धापटे, ॲडव्होकेट**
श्रीराम, ११९ कळस आळंदी रोड, पुणे- ४११०१५
(पा.क्र. २५०८१६३२४६)